तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २५ डिसेंबर २०२४

आतील पानावर

पान २ – मला बायोपिकपासून दूर राहायचेयं
पान ३ – 'वॉर २'मध्ये थिरकणार ही अभिनेत्री?
पान ४ – 'ऐतराज २'मधून प्रियंकाचा पत्ता कट
पान ५ – नयनताराच्या नवीन चित्रपटाचे नाव ...
पान ६ – उपेंद्र लिमये झळकणार तेलूगु चित्रपटात

# 'कॉकटेल' मध्ये दिसणार शाहिद कपूर?



'कॉकटेल' या २०१२ साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटाचा सिक्वेल लवकरच येणार आहे. या सिनेमात सैफ अली खान आणि दीपिका पादुकोण यांनी प्रमुख भूमिका साकारली होती. याशिवाय अभिनेत्री डायना पेन्टीनेही यात काम केले आहे. मात्र या चित्रपटात सैफ अली खानच्या जागी शाहिद कपूर मुख्य भूमिकेत असणार असल्याचं म्हटलं जात आहे. शाहिदनेही 'कॉकटेल २'मध्ये काम करण्यास उत्सुकता दाखवली आहे. याशिवाय आधीच्या सिनेमातील दीपिका- डायनाऐवजी 'कॉकटेल २'मध्ये अनन्या पांडे आणि सारा अली खान झळकण्याची शक्यता आहे. हा चित्रपट पुन्हा एकदा होमी अदजानिया दिग्दर्शित करणार आहे, ज्यांनी २०१२ मधील मूळ चित्रपट कॉकटेल दिग्दर्शित केला होता. रिपोर्टनुसार, शाहिदला चित्रपटाची कथा खूप आवडली. त्यामुळे विशाल भारद्वाजचा ॲक्शन थ्रिलर 'देवा' चित्रपटातचे काम पूर्ण केल्यानंतरच शाहिद कपूर 'कॉकटेल २' चे शूटिंग सुरू करू शकतो. समोर आलेल्या वृत्तानुसार, शाहिद कपूरने अद्याप हा चित्रपट साईन केलेला नाही, परंतु त्याने या चित्रपटासाठी सहमती दर्शवली आहे. शाहिदचा २०२४ मध्ये आलेल्या 'तेरी बातों में उलझा जिया' सिनेमानंतर तो पुन्हा एकदा 'कॉकटेल २' निमित्ताने दिनेश विजान यांच्यासोबत काम करणार आहे. सध्या तरी सिनेमाच्या कथेवर काम सुरु आहे. सर्व काही फायनल झाल्यावर पुढील वर्षी २०२५ मध्ये या सिनेमाच्या शूटिंगला सुरुवात होऊन २०२६ ला सिनेमा रिलीज होण्याची शक्यता असल्याचे म्हंटले जात आहे.



# मला बायोपिकपासून दूर राहायचंय



बॉलिवूडमध्ये मोठे यश संपादन केल्यानंतर रणदीपने काही महिन्यांपूर्वीच त्याच्या नव्या आयुष्याला सुरुवात केली आहे. अभिनेता गर्लफ्रेंड लिन लैशरामसोबत लग्नाच्या बेडीत अडकला आहे. त्यानंतर अभिनेता 'स्वातंत्र्यवीर सावरकर' यांच्या बायोपिकमध्ये झळकला होता. मात्र, आता रणदीप बायोपिक चित्रपटांना कंटाळलेला दिसतोय. नुकतंच 'इफ्फी २०२४' मध्ये याविषयी बोलताना रणदीप म्हणाला की, आता त्याला मसाला चित्रपटांकडेही वळायचे आहे. जेव्हा रणदीपला विचारण्यात आले की, त्याला आणखी बायोपिक करायला आवडेल का? तर रणदीपने सांगितले की, शेरसिंह राणावर काम अजूनही सुरू आहे. मी बायोपिकपासून दूर राहण्याचा प्रयत्न करत आहे कारण ते खूप थकवणारे आहेत. पण सावरकरांपूर्वी मी ॲक्शन आणि रोमँटिक चित्रपट केले आहेत हे लोक विसरतात. मी सर्व प्रकारचे चित्रपट केले आहेत. मनोरंजक सिनेमाद्वारे प्रेक्षकांपर्यंत पोहोचायला मला आवडेल. असं तो म्हणाला. रणदीपने स्वातंत्र्यवीर सावरकर या चित्रपटाचे दिग्दर्शनही केले होते. त्यानंतर त्याला दिग्दर्शनाच्या अनेक ऑफर्सही आल्या. याबद्दल बोलताना रणदीप म्हणाला, 'माझ्याकडे अनेक ऑफर्स आहेत, पण मी त्यात अभिनय केला तरच दिग्दर्शन करेन कारण मला माझ्यापेक्षा चांगला अभिनेता मिळणार नाही. माझ्याकडे दोन-तीन ऑफर आहेत, पण त्या बहुतेक ॲक्शनच्या आहेत. सावरकरांचा बायोपिक बनवणे आणि रिलीज करणे किती कठीण होते हे रणदीपने सांगितले. तो म्हणाला, हे बनवणे आणि रिलीज करणे खूप आव्हानात्मक होते. आम्ही थोड्या फरकाने ऑस्करला मुकलो, पण मला खात्री आहे की याला प्रचंड प्रेक्षक मिळतील. मी शूटिंग करत असलेल्या फेस्टिव्हलमधून मला आमंत्रणे मिळत राहिली आणि मी त्यांना उपस्थित राहू शकलो नाही. रणदीप पुढे म्हणाला मी नेहमीच असा होतो आणि आता मी मसाला चित्रपट बनवण्याच्या मार्गावर आहे. जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याची प्रत्येक कलाकाराची सर्वात मोठी इच्छा असते आणि हे आमचे नियोजन आहे. असं अभिनेत्यानं यावेळी सांगितलं.

# 'सोनू के टीटू की स्वीटी' सिनमाचा सिक्वेल येणार

अनेक धाटणीचे बॉलिवूड सिनेमे प्रेक्षकांच्या भेटीला येत असतात. यातले काही सिनेमे हे सिक्वल असतात तर काही ओरिजिनल. एखाद्या सिनेमानं बॉक्स ऑफिसच्या पडद्यावरील खणखणीत कामगिरी केली की त्या सिनेमाचा सिक्वेल व्हावा, अशी मागणी निर्मात्यांची आणि सिनेरसिकांचीदेखील असते. यातच आता अभिनेता कार्तिक आर्यनच्या 'सोनू के टीटू की स्वीटी' सिनेमाचा सिक्वेलची चर्चा रंगली आहे. कार्तिक आर्यनबॉलिवूडच्या मोस्ट टॅलेंटेड अभिनेत्यांपैकी पैकी एक आहे. सध्या अभिनेत्याची 'भूल भूलैया-३' मुळे सर्वत्र चर्चा होताना दिसते. त्याचा हा सिनेमा दणक्यात कमाई करतोय. कार्तिक आर्यन त्याच्या अभिनयानेच नाही तर हसतमुख स्वभावाने प्रेक्षकांची मनं जिंकतो. कार्तिकच्या करिअरचा आलेख 'सोनू के टीटू की स्वीटी' सिनेमानं उंचावला होता. या कॉमेडी चित्रपटाने प्रेक्षकांना पोट धरून हसायला लावले होते. आता चित्रपटाचा अधिकृत सिक्वेलवर काम सुरू आहे. एका वृत्तानुसार, कार्तिक आणि लव रंजन यांच्यात 'सोनू के टीटू की स्वीटी २' बद्दल बोलणं झालं आहे. २०२५ च्या उत्तरार्धात चित्रीकरण सुरू करण्याची योजना आहे. लव रंजन सध्या या रोमँटिक कॉमेडीच्या दुसर्या भागाची पटकथा लिहित आहेत. पण, 'सोनू के टीटू की स्वीटी २'मध्ये कथा जिथे संपली तिथून सुरू होईल, की दुसर्या भागात सिनेमाची कथा पूर्णपणे नवी असेल, हे अद्याप निश्चित झालेले नाही. दरम्यान, सिक्वेलवर अधिकृतपणे कार्तिक किंवा लव रंजन यांनी कोणीही भाष्य केलेलं नाही.



अभिनेता टायगर श्रॉफच्या 'बागी ४' या चित्रपटाची घोषणा झाल्यापासून चाहत्यांची उत्सुकता अधिक वाढली आहे. या चित्रपटात संजय दत्त खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. नुकतेच या चित्रपटातील त्याचा जबरदस्त लुक शेअर करण्यात आला आहे. यानंतर आता या चित्रपटाबाबत आणखी एक अपडेट समोर येत आहे. या चित्रपटात कोणत्या अभिनेत्रीची एन्ट्री होणार, याबाबत स्वत: टायगर श्रॉफने माहिती दिली आहे. अभिनेत्री सोनम बाजवाची 'बागी ४'मध्ये दिसणार आहे. फिल्ममेकर साजिद नाडियाडवाला यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवर सोनम बाजवा 'बागी ४'मध्ये प्रमुख भूमिका साकारणार असल्याचं सांगितलं. टायगर श्रॉफने कॅप्शनमध्ये लिहिले की, रिबेल कुटुंबातील नवीन सदस्याचं स्वागत. बागी युनिव्हर्स, साजिद नाडियादवाला यांच्या 'बागी ४' मध्ये सोनम बाजवाचा सहभाग झाल्याने मी खूप उत्साही आहे. 'बागी' युनिव्हर्समध्ये याआधी दिशा पाटनी आणि श्रद्धा कपूर या अभिनेत्री झळकल्या होत्या. आता 'बागी ४' मध्ये सोनम बाजवा मुख्य हिरोईन म्हणून काम करणार आहे. ५ सप्टेंबर २०२५ ला 'बागी ४२ सिनेमा थिएटरमध्ये रिलीज होणार आहे. बागी ४' सिनेमाची सर्वांना उत्सुकता आहे. 'बागी' युनिव्हर्सचे याआधीचे तीनही सिनेमे प्रचंड गाजले. आता या चित्रपटाच्या चौथ्या भागासाठी चाहते उत्सुक आहेत. 'बागी' हा एक ॲक्शन-थ्रिलर चित्रपट आहे, ज्याचा पहिला भाग २०१६ मध्ये प्रदर्शित झाला होता. याचे दिग्दर्शन सब्बीर खान यांनी केले होते. तर अहमद खान दिग्दर्शित 'बागी २' २०१८ साली रिलीज झाला होता. दुसर्या हप्त्यात टायगरसोबत दिशा पटानी, मनोज बाजपेयी, दर्शन कुमार, प्रतीक बब्बर, रणदीप हुडा आणि दीपक डोबरियाल होते. चित्रपटाचा तिसरा भाग देखील अहमद खानने दिग्दर्शित केला होता, यात टायगर श्रॉफ, रितेश देशमुख आणि श्रद्धा कपूर मुख्य भूमिकेत होते.

# 'बागी ४' चित्रपटात 'या' अभिनेत्रीची लागली वर्णी



# अक्षय कुमारचा 'भूत बंगला' लवकरच होणार प्रदर्शित

बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमार लवकरच 'भूत बंगला' या आगामी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सप्टेंबर महिन्यात त्याने या चित्रपटाची घोषणा केली होती. चित्रपटाची घोषणा झाल्यापासून चाहत्यांच्या मनात हा चित्रपट केव्हा प्रदर्शित होणार याबाबत उत्सुकता आहे. अशात आता बॉलीवूडचा खिलाडी म्हणून ओळखल्या जाणार्या अक्षयने 'भूत बंगला' चित्रपटाबाबत एक महत्त्वाची अपडेट दिली आहे. अक्षय कुमारने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक पोस्टर शेअर केले आहे. त्यात त्याने चित्रपट प्रदर्शित केव्हा होणार याची माहिती दिली आहे. तसेच चित्रपटाच्या शूटिंगबद्दल अपडेट दिली आहे. अक्षयने शेअर केलेल्या चित्रपटाच्या पोस्टरमध्ये तो एका बंगल्यावर हातात एक दिवा घेऊन बसला आहे. तसेच यावर चित्रपट २ एप्रिल २०२६ रोजी चित्रपट प्रदर्शित होणार असल्याची तारीख लिहिण्यात आली आहे. अभिनेत्याने यावर कॅप्शनमध्ये लिहिले, माझे आवडते कलाकार प्रियदर्शन यांच्यासह काम करण्यासाठी मी फार उत्सुक आहे. आजपासून आम्ही 'भूत बंगला' चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात करीत आहोत. हा भीती आणि हास्याचा दुहेरी डोस तुमच्यासाठी २ एप्रिल २०२६ ला तयार असेल. तोपर्यंत तुमच्या सदिच्छा सोबत असाव्यात.

अक्षय कुमारचा 'भूत बंगला' हा एक हॉरर कॉमेडी चित्रपट आहे. याआधी अक्षयने प्रियदर्शन यांच्या 'भूल भुलैया' या चित्रपटात काम केले आहे. त्याच्या या चित्रपटावर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केले होते. आता पुन्हा एकदा ही जोडी एकत्र काम करणार असल्याने प्रेक्षकांच्या मनात 'भूत बंगला' पाहण्याची उत्सुकता वाढली आहे. प्रियदर्शन दिग्दर्शित भूत बंगला या चित्रपटाची निर्मिती शोभा कपूर, एकता आर. कपूर, बालाजी मोशन पिक्चर्स, केप ऑफ गुड फिल्म्स प्रॉडक्शन हाउसद्वारे होणार आहे. तसेच या चित्रपटाची कथा आकाश ए. कौशिक यांनी लिहिली आहे. तसेच संवाद लेखन रोहन शंकर यांनी केलं आहे. अक्षय कुमारच्या या हॉरर कॉमेडी चित्रपटात अभिनेत्री वामिका गब्बीदेखील झळकणार आहे. चित्रपटात ती एक महत्त्वपूर्ण भूमिका साकारणार आहे. तसेच वामिकाचे पात्र चित्रपटातील हास्यकल्लोळ आणखी वाढणारे ठरणार आहे.

# 'वॉर २'मध्ये थिरकणार ही अभिनेत्री?



अभिनेता हृतिक रोशन 'वॉर २' चित्रपटातून पुन्हा एकदा कबीरच्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटात हृतिकसोबत ज्युनियर एनटीआर खलनायकाच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. या बहुप्रतिक्षित ॲक्शन चित्रपटात एक खास गाणे असणार आहे, ज्यामध्ये बॉलीवूडची सुप्रसिद्ध अभिनेत्री असणार असल्याचा अंदाज काही मीडिया रिपोर्ट्समध्ये व्यक्त केला जात आहे.

'वॉर २' मध्ये अभिनेत्री श्रद्धा कपूर थिरकताना दिसणार आहे. सध्या तरी श्रद्धाशी याविषयी प्राथमिक बोलणी सुरु असून अजूनतरी यावर कोणतंही अधिकृत वक्तव्य समोर आलेले नाही. मात्र, याबाबत चित्रपटाच्या टीमकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. त्यामुळे चाहत्यांना आणखी प्रतीक्षा करावी लागेल.

दरम्यान, ज्युनियर एनटीआर आणि हृतिक रोशन पहिल्यांदाच पडद्यावर एकत्र येत असल्याने चित्रपटाविषयीची उत्सुकता खूप वाढली आहे. 'वेक अप सिड', 'ये जवानी है दिवानी', 'ब्रह्मास्त्र' सारखे चित्रपट बनवणारा अयान मुखर्जी या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहे. तर आदित्य चोप्राच्या यशराज बॅनरखाली हा चित्रपट तयार होत आहे. 'वॉर' २०१९ साली रिलीज झाला होता. या चित्रपटात हृतिक रोशन आणि टायगर श्रॉफ एकमेकांना भिडताना दिसले होते. हा चित्रपट सुपरहिट ठरला होता. यानंतर आता या चित्रपटाच्या पुढील भागासाठी देखील चाहते कमालीचे उत्सुक आहेत.

# 'ऐतराज २'मधून प्रियंकाचा पत्ता कट



मागील वर्षी 'गदर २' हिट झाल्यानंतर बॉलिवूडच्या सर्व यशस्वी चित्रपटांचे सीक्वल बनवण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. आता अक्षय कुमारच्या एका सुपरहिट चित्रपटाचा सिक्वेल देखील बनवला जाणार आहे. २००४ मध्ये रिलीज झालेला अक्षय कुमार, करीना कपूर आणि प्रियांका चोप्रा स्टारर 'ऐतराज' हा लोकप्रिय चित्रपट होता. आता 'ऐतराज'चे निर्माते सुभाष घई यांनी या चित्रपटाच्या सीक्वलवर काम करत असल्याची पुष्टी केली आहे. तथापि, त्यांनी आणखी एक अपडेट शेअर केली आहे, जी कदाचित लोकांना आवडणार नाही. ती म्हणजे सीक्वलमध्ये प्रियांका चोप्रा, अक्षय कुमार किंवा करीना कपूर नसल्याचंही त्यांनी सांगितलं. यामागचे कारण सांगताना सुभाष म्हणाले की, 'ऐतराज' रिलीज होऊन २० वर्षांहून अधिक काळ झाला असून आता नव्या पिढीतील कलाकारांना घेऊन त्याचा सीक्वल बनवावा लागणार आहे.

सुभाष घई यांनी त्यांचे प्रॉडक्शन हाऊस 'खलनायक २'वर देखील काम करत असल्याचे सांगितले. ते म्हणाला की, 'कहाणी आणि कलाकार ३-४ महिन्यांत लॉक झाल्यावर आम्ही संपूर्ण घोषणा करू.' 'ऐतराज'चे दिग्दर्शक अब्बास-मस्तान यांनी केले आहे. पण 'ऐतराज २'साठी सुभाष घई यांनी 'OMG2' दिग्दर्शित केलेल्या अमित रायची निवड केलीय. ते म्हणाले, 'मी अमित राय यांच्याकडून एक उत्तम स्क्रिप्ट ऐकली आहे, जी सध्या 'ऐतराज २' म्हणून लिहिली जात आहे.

आम्हाला वेगवेगळ्या स्टुडिओमधून चित्रपट बनवण्यात रस असल्याचे फोन येत आहेत आणि मी म्हणायलाच पाहिजे की अमितने यावेळी पुन्हा एक उत्तम स्क्रिप्ट बनवली आहे. मला ती खूप आवडली आहे.




# 'भागम भाग' सिनेमाचा सिक्वेल येणार?

अक्षय कुमार, गोविंदा आणि परेश रावल या कलाकारांच्या मुख्य भूमिका असलेला 'भागम भाग' या चित्रपटाचा सिक्वेल प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. १८ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या या सुपरहिट कॉमेडी चित्रपटच्या सिक्वेलची अधिकृत घोषणा निर्मात्यांनी केली आहे. आता 'भागम भाग २' चे पटकथालेखन सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. 'भागम भाग २' च्या हक्कांचे हस्तांतरण 'शेमारू एंटरटेन्मेंट'कडून 'रोअरिंग रिव्हर प्रॉडक्शन'च्या सरिता अश्विन वर्दे यांच्याकडे करण्यात आले आहे. सरिता या चित्रपटाच्या पटकथेवरदेखील काम करत असून त्या शेमारूच्या सहकार्याने चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. या घोषणेबाबत बोलताना सरिता म्हणाल्या, 'भागम भाग'सारख्या चित्रपटाचा सिक्वेल यायला हवा असं मला वाटत होतं. योग्य वेळेची वाट पहात आम्ही हा निर्णय घेतला आणि आता हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज आहे. शेमारू एंटरटेन्मेंटचे सीईओ हिरण गडा यांनीही या सिनेमाबद्दल आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, या चित्रपटाने प्रेक्षकांचं ज्याप्रकारे मनोरंजन केलं, त्याच पद्धतीने सिनेमाच्या नव्या भागातूनही प्रेक्षकांचं मनोरंजन व्हावं यासाठी आम्ही एका उत्कृष्ट टीमबरोबर काम करत आहोत. २०२५ च्या मध्यावर या सिनेमाचे प्रोडक्शनचे काम सुरू होईल असे बोलले जात आहे. या चित्रपटात अक्षय कुमार, गोविंदा आणि परेश रावल यांची लोकप्रिय पात्रे पुन्हा एकत्र पाहायला मिळण्याची शक्यता आहे. 'भागम भाग'चं दिग्दर्शन करणारे प्रियदर्शन सिक्वेलसाठी परत येणार का? याबाबत कोणतीही पुष्टी झालेली नाही. मात्र, 'भागम भाग'च्या चाहत्यांसाठी हा सिक्वेल निश्चितच एक आनंदाची बातमी ठरणार आहे.

# एखादा सिनेमा गेला तरी त्याची खंत करायची नाही



अभिनेते नाना पाटेकरांनी मराठीसह अनेक चित्रपटांत कामं करून त्यांची स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या अनेक भूमिका, डायलॉग लोकप्रिय झाले आहेत. १९९४ साली प्रदर्शित झालेला 'क्रांतिवीर' चित्रपटातील 'आ गए मेरी मौत का तमाशा देखने'हा डायलॉग असो किंवा २०१६ साली प्रदर्शित झालेला 'नटसम्राट' चित्रपटातील 'कुणी घर देता का घर?' डायलॉग असो. नाना पाटेकरांनी त्यांच्या प्रत्येक भूमिकेतून प्रेक्षकांच्या मनात स्वत:ची जागा निर्माण केली. आता एका मुलाखतीत त्यांनी अभिनय क्षेत्रात यायचे का निवडले, काही भूमिका गमावण्याची खंत आहे का? याबद्दल वक्तव्य केले आहे. अभिनेते नाना पाटेकर यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. ही मुलाखत लेखक अरविंद जगताप यांनी घेतली आहे. या मुलाखतीत अरविंद जगताप यांनी विचारले की, अभिनयच करावा असं का वाटलं? यावर बोलताना नाना पाटेकरांनी म्हटले, एक तर माझा गंड होता की माझे आई-वडील माझ्या दुसऱ्या भावंडांवर जास्त प्रेम करतात, माझ्यावर कमी करतात. माझं नाटक होतं ते पाहायला वडील मुंबईहून गावाला आले. म्हटलं वडिलांचं लक्ष वेधण्यासाठी हे चांगलं आहे. तिथून कुठेतरी माझं नाटक सुरू झालं. वडिलांना नाटक-सिनेमाचं भयंकर वेड होतं. 'हामिदाबाईची कोठी' नाटक झाल्यावर ते बॅक स्टेजला आले आणि विजयाबाईंना म्हणाले, फार सुंदर नाटक आहे. तुम्ही सगळ्यांनी अप्रतिम कामं केलीत. माझ्याकडे बोट दाखवत म्हणाले, या मुलाने सगळ्यात छान काम केलं. तर बाईंना माहीत नव्हतं ते कोण आहेत. बाई म्हणाल्या, म्हणजे काय? माझा मुलगा आहे तो. वडील म्हणाले, हो, माझाही आहे. तेव्हा मी बाईंना ओळख करून दिली की हे माझे वडील आहेत, त्यांना खूप अभिमान आहे की हा माझा मुलगा आहे. पुढे बोलताना अरविंद जगताप यांनी म्हटले, तुम्ही ओटीटीच्या आधीचे सुपरस्टार. तुम्ही पहिल्यापासून अग्नीसाक्षी आणि इतर सिनेमे केलेत. यावर नाना पाटेकरांनी म्हटले, नाही, नाही. मला या इंडस्ट्रीनं नाव दिलं, खूप पैसे दिले. खूपसे रोल गेले माझे त्यात माझा माजोर्डेपणा; पण ते ठीक आहे, आपण आपल्या पद्धतीनं जगू शकलो याचं समाधान आहे. त्यांना विचारले की, एखादा सिनेमा गेला त्याची खंत नाही का? यावर नाना पाटेकरांनी म्हटले, कशाची? जे आपलं नव्हतं ते नाही. ते सोडून द्या ना, असे म्हणत नाना पाटेकरांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. दरम्यान, नाना पाटेकर हे त्यांच्या अभिनयाबरोबरच त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठीदेखील ओळखले जातात. याचबरोबर, त्यांच्या सामाजिक कामांचीदेखील चर्चा होताना दिसते.



## ‘पुष्पा २’ मधील खलनायक करणार बॉलीवूडमध्ये पदार्पण

मल्याळम इंडस्ट्रीतील अभिनेता फहाद फासिल बॉलीवूडमध्ये पदार्पण करणार असल्याची माहिती समोर येत आहे. तो तृप्ती डिमरीसोबत रोमान्स करताना पाहायला मिळणार आहे. तृप्तीला ‘निमल’ चित्रपटानंतर मोठी लोकप्रियता मिळाली. आता दोन्ही कलाकरांना एकत्र पाहण्यासाठी चाहतेही उत्सुक आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार, प्रसिद्ध दिग्दर्शक इम्तियाज अली त्यांच्या पुढील प्रोजेक्टसाठी फहाद फासिलला विचारलं आहे. इम्तियाज अली आगामी प्रोजेक्ट फक्त दिग्दर्शित करणार नसून निर्मितीची धुरादेखील सांभाळणार आहेत. यामध्ये तृप्ती डिमरी फहादची हिरोइन असणार आहे. फहाद फासिलही इम्तियाज अली यांच्या प्रोजेक्टमधून बॉलीवूडमध्ये पदार्पण करण्यासाठी खूप उत्सुक आहे. गेल्या काही दिवसांपासून इम्तियाज अली त्यांच्या या आगामी प्रोजेक्टविषयी चर्चा करत आहे. इम्तियाज अली त्याच्या विंडो सीट फिल्म्स बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती करण्यात येणार आहेत. फहाद फासिलच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर तो अल्लू अर्जुनच्या ‘पुष्पा २’ चित्रपटात पाहायला मिळणार आहे. पुष्पा या चित्रपटातील फहादच्या अभिनयाचे खूप कौतुक झाले होते.

# प्रभाससोबत स्पिरिट’मध्ये झळकणार मराठमोळी अभिनेत्री?

दिग्दर्शक संदीप रेड्डी वंगा यांच्या ‘कबीर सिंग’ आणि ‘ॲनिमल’ या दोन्ही चित्रपटांना मोठा प्रतिसाद मिळाला. या चित्रपटाच्या यशानंतर संदीप रेड्डी वंगा आणखी एक मोठा चित्रपट ‘स्पिरिट’ बनवण्याच्या तयारीत आहे. या चित्रपटात प्रभास एका पोलिसाच्या भूमिकेत दिसणार आहे. विशेष म्हणजे या चित्रपटात एक मराठमोळी अभिनेत्री प्रभाससोबत स्क्रीन शेअर करणार आहे. ‘स्पिरिट’ची टीम सध्या या चित्रपटासाठी प्री-प्रॉडक्शन आणि कास्टिंग करत आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, दिग्दर्शक संदीप रेड्डी वंगा आणि निर्माते भूषण कुमार या ॲक्शन चित्रपटाच्या मुख्य भूमिकेसाठी अभिनेत्री मृणाल ठाकूरशी चर्चा करत आहेत. याशिवाय यात करीना कपूर खान आणि सैफ अली खान देखील दिसणार असल्याचे वृत्त समोर येत आहे. या चित्रपटात दोघेही नकारात्मक भूमिका साकारणार असल्याची चर्चा आहे. पहिल्यांदाच खर्या आयुष्यातले जोडपे एका हिंदी चित्रपटात निगेटिव्ह भूमिका साकारणार आहेत. त्यामुळे चाहत्यांमध्ये या चित्रपटाची उत्सुकता वाढली आहे. या चित्रपटातही हर्षवर्धन रामेश्वर संगीत देत आहे, ज्याने ‘निमल’मध्ये संगीत दिले होते. ‘स्पिरिट’ची निर्मिती भद्रकाली पिक्चर्स आणि टी-सीरीज संयुक्तपणे करत आहे. ‘स्पिरिट’ २०२६ मध्ये रिलीज होण्याची शक्यता आहे. याशिवाय संदीप रेड्डी वंगा रणबीर कपूरसोबत ‘निमल पार्क’ चित्रपटावर देखील काम करत आहेत.





# नयनताराच्या नवीन चित्रपटाचे नाव आले समोर

आजकाल नयनतारा तिच्या नयनतारा बियॉन्ड द फेयरीटेल या माहितीपटामुळे चर्चेत आहे. कॉपीराइटच्या मुद्द्यावरून अभिनेता धनुषसोबत झालेल्या वादामुळेही ती चर्चेत असते. दरम्यान, त्याच्या नवीन चित्रपटाचे नाव आणि काही दृश्ये सोशल मीडियावर शेअर करण्यात आली आहेत. या सीन्समध्ये ती एका दमदार भूमिकेत दिसत आहे. नयनताराच्या आगामी चित्रपटाचे नाव रक्कयी आहे. तिने तिच्या सोशल मीडिया अकाऊंटवर शेअर केलेल्या तिच्या चित्रपटातील दृश्यांमध्ये ती आपल्या मुलाला हल्लेखोरांपासून वाचवताना दिसत आहे. पहिल्याच सीनमध्ये ती ॲक्शन करताना दिसत आहे. नयनताराने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर रक्कयी चित्रपटातील एक लघुचित्र शेअर केले आहे. त्यासोबत एक कॅप्शनही लिहिले आहे. त्यामुळे चित्रपटाची कथा काही प्रमाणात माहीत आहे. ती कॅप्शनमध्ये लिहिते: ज्या देशात न्याय फक्त आठवणी बनला आहे. तिथे एक आई राहत होती जिचे जग तिचे मूल होते, पण जेव्हा तिच्या मुलीचा जीव राक्षसापासून धोक्यात आला तेव्हा ती पळून गेली नाही, अडखळली नाही. त्याऐवजी ती युद्धाची घोषणा करते. कॅप्शनमध्ये दिलेले हे वर्णन नयनताराच्या चित्रपटाची कथा सांगते. या चित्रपटात ती एका आईची भूमिका साकारताना प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे जिचे एकमेव ध्येय आपल्या मुलीचे रक्षण करणे आहे. यासाठी तो वाईट लोकांशीही लढायला तयार असतो. नयनतारा तिच्या रक्कयी या चित्रपटात जबरदस्त ॲक्शन करताना दिसणार आहे. आतापर्यंत प्रेक्षक दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये मुख्य कलाकारांना अशा प्रकारचे ॲक्शन करताना पाहत असत, पण आता नयनताराही आपला ॲक्शन पराक्रम दाखवणार आहे. तिने याआधी अनेक चित्रपटांमध्ये ॲक्शन सीन केले आहेत पण संपूर्ण चित्रपटात ॲक्शन करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

मराठी चित्रपटसृष्टीचा 'मितवा' म्हणून स्वप्नील जोशीला घराघरांत ओळखलं जातं. 'दुनियादारी', 'तू ही रे', 'मितवा', 'प्यारवाली लव्हस्टोरी', 'वाळवी' यांसारख्या गाजलेल्या सिनेमांमध्ये स्वप्नीलने काम केलं आहे. मराठी मालिका, चित्रपट, वेबसीरिज अशा तिन्ही माध्यमांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणार हरहुन्नरी अभिनेता म्हणून त्याला ओळखलं जातं. प्रेक्षकांच्या याच लाडक्या अभिनेत्याने वर्षाखेरीस सर्वांना एक आनंदाची बातमी दिली आहे. मराठी चित्रपटसृष्टी गाजवणार स्वप्नील आता लवकरच एका गुजराती चित्रपटात झळकणार आहे. स्वप्नील जोशी २०२५ मध्ये गुजराती चित्रपट इंडस्ट्रीत पदार्पण करण्यासाठी सज्ज झाला आहे. त्याच्या पहिल्या गुजराती चित्रपटाचं नाव आहे 'शुभचिंतक'. या चित्रपटात स्वप्नीलबरोबर राष्ट्रीय पुरस्कार विजेती अभिनेत्री मानसी पारेख मुख्य भूमिकेत झळकणार असल्याची माहिती समोर आली आहे. 'शुभचिंतक' या चित्रपटाची निर्मिती पार्थिव गोहिल आणि मानसी पारेख त्यांच्या सोल सूत्र या बॅनरखाली करत आहेत. यापूर्वी 'गोलकेरी', 'कच्छ एक्स्प्रेस' आणि 'झामकुडी' या गाजलेल्या चित्रपटाची निर्मिती त्यांनी केलेली आहे. या तीन चित्रपटांच्या यशानंतर आता 'शुभचिंतक' त्यांच्या बॅनरचा चौथा चित्रपट असणार आहे. या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी निसर्ग वैद्य यांच्याकडे आहे. हा चित्रपट एक डार्क कॉमेडी थ्रिलर असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. पहिल्या गुजराती चित्रपटाबद्दल उत्सुकता व्यक्त करताना स्वप्नील म्हणाला, गुजराती इंडस्ट्री गेल्या वर्षात वेगाने विकसित होत आहे आणि वैविध्यपूर्ण विषयांची निर्मिती त्याठिकाणी केली जात आहे. एक कलाकार म्हणून ही संधी माझ्यासाठी नक्कीच खास आहे आणि गुजराती चित्रपट विश्वात काहीतरी वेगळं करायला मिळतंय याचा मला आनंद आहे. मी नेहमीच मानसीची एक अभिनेत्री म्हणून प्रशंसा केली आहे आणि तिच्याबरोबर काम करण्याची माझी इच्छा पूर्ण होत आहे. या भूमिकेने मला नक्कीच एक नवीन आव्हान दिलं आहे आणि ही भूमिका साकारण्यासाठी मी प्रचंड उत्सुक आहे. चित्रपटाची मुख्य अभिनेत्री-निर्माती मानसी पारेख पुढे म्हणाली, स्वप्नील या चित्रपटात ऑनबोर्ड झाला आहे याचा आम्हाला सगळ्यांना आनंद झाला आहे. स्वप्नीलबरोबर स्क्रीनस्पेस शेअर करण्यासाठी मी खूप उत्सुक आहे. आम्ही लूक टेस्ट आणि वर्कशॉपसाठी आधीच भेटलो आहोत आमच्या सुरुवातीच्या नोट्सची देवाणघेवाण केली आणि आता शूटिंगला कधी एकदा सुरुवात होतेय यासाठी सगळेच आतुर

# स्वप्नील जोशीने केली पहिल्या गुजराती चित्रपटाची घोषणा





# उपेंद्र लिमये झळकणार तेलूगु चित्रपटात

अभिनेते उपेंद्र लिमये यांनी मराठीसह हिंदी चित्रपटांमध्ये देखील दमदार अभिनय केला आहे. 'ॲनिमल' चित्रपटातील फ्रेडी पाटील या त्यांच्या भूमिकेचे सर्वत्र कौतुक झाले होते. यानंतर ते एका तेलुगु चित्रपटात काम करणार आहेत. दाक्षिणात्य अभिनेता व्यंकटेश दग्गुबतीसोबत ते स्क्रीन शेअर करणार आहेत. उपेंद्र लिमयेंची महत्त्वाची भूमिका असणारा पहिला तेलुगू चित्रपट पुढच्या वर्षी प्रदर्शित होणार आहे. यासंदर्भातील व्हिडीओ उपेंद्र यांनी इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. यात उपेंद्र लिमये सांगतात की, नमस्कार, हा माझा पहिला तेलुगू 'संक्रांतिकी वास्तुनम' नावाचा व्यावसायिक चित्रपट आहे. या चित्रपटाचं शूटिंग काल संपले आणि आज मी या चित्रपटाचं डबिंग सुद्धा संपवलं आहे. इतक्या वर्षांच्या करिअरमध्ये कधीही शूटिंग संपवून, लगेच आज डबिंग पूर्ण झालंय, असं झालेलं नाही. पहिल्यांदाच असं झालंय आणि हा एक अत्यंत समृद्ध करणारा व्यावसायिक अनुभव मिळाला. मला ही संधी दाक्षिणात्य लेखक-दिग्दर्शक अनिल रवीपुडी यांच्यामुळे मिळाली. तेलुगू इंडस्ट्री मधील ब्लॉकबस्टर लेखक-दिग्दर्शक अशी यांची ओळख आहे. सर, तुमचे खूप आभार तुमच्याबरोबर काम करताना खूप मजा आली. या चित्रपटामध्ये तुम्हाला उपेंद्र यांची एक वेगळी बाजू पाहायला मिळेल, असे म्हणत त्यांनी उपेंद्र लिमये यांचे कौतुक केले. दरम्यान, संक्रांतिकी वास्तुनम हा चित्रपट येत्या १४ जानेवारीला प्रदर्शित होणार आहे. उपेंद्रच्या चित्रपटांबद्दल बोलायचे झाले तर, 'निमल' नंतर 'मडगाव एक्सप्रेस' हा त्याचा नवा हिंदी चित्रपट आहे. तो शेवटचा 'कर्म विरायण' या मराठी चित्रपटात दिसला होता. याशिवाय त्याने 'माय नेम इज ३४०', 'डार्लिंग', 'चांदनी बार' आणि 'पेज ३' यांसारख्या हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आहे.




# तुमच्या बायोपिकमध्ये कोणत्या अभिनेत्रीला पाहायला आवडेल?

'मराठमोळी अभिनेत्री वर्षा उसगांवकर या त्यांच्या चित्रपट, मालिकेतील भूमिकेमुळे सतत चर्चेत असतात. आता मात्र एका मुलाखतीमध्ये त्यांनी केलेल्या वक्तव्याची चर्चा होताना पाहायला मिळत आहे. जर त्यांच्यावर बायोपिक आला तर त्यामध्ये कोणत्या अभिनेत्रीला पाहायला आवडेल, याबद्दल त्यांनी वक्तव्य केले आहे. नुकतीच वर्षा उसगांवकरांनी एक मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये त्यांना विचारण्यात आले की, तुमच्यावर बायोपिक निघाला तर तुमच्या बायोपिकमध्ये कोणत्या अभिनेत्रीला पाहायला आवडेल? यावर वर्षा यांनी म्हटले, मला वाटतं एक काळ असा होता की अर्चना जोगळेकर आणि माझ्यात साधर्म्य आहे, असे लोक म्हणायचे. मला पुरस्कार मिळाला की लोक तिचे अभिनंदन करायचे. तिला मिळाला तर माझं अभिनंदन करायचे. तर अर्चना जोगळेकरसारखी दिसणारी तरूण अभिनेत्री कोण असती तर मी म्हटलं असतं तिला माझ्या बायोपिकमध्ये घ्या. पण, तिच्यासारखी दिसणारी मला आता तरी कोणी वाटत नाही. पटकन कोणी डोळ्यासमोर येत नाही. याच मुलाखतीत वर्षा उसगांवकरांनी 'बिग बॉस मराठी ५'मधील सदस्यांविषयी त्यांचे मत मांडले आहे. याबरोबरच वर्षा उसगांवकरांनी मिथुन चक्रवर्ती, ऋषी कपूर यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभवदेखील सांगितला आहे. ऋषी कपूर यांच्याबरोबर त्यांनी 'हनिमून' चित्रपटात काम केले होते. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान ज्यावेळी ऋषी कपूर सेटवर यायचे तेव्हा जास्त बोलायचे नाहीत, त्यामुळे ते खडूस आहेत असे मला वाटत होते, असे वर्षा उसगांवकरांनी म्हटले. पुढे त्यांच्याबद्दल बोलताना वर्षा उसगांवकरांनी म्हटले की, मी त्यांचे 'खुल्लम खुल्ला' हे आत्मचरित्र वाचले. त्यामध्ये त्यांनी माझ्याबरोबर काम केल्याचा उल्लेख केला आहे, त्यामुळे ते खडूस होते हा माझा गैरसमज होता असे म्हणत वर्षा उसगांवकरांनी आठवण सांगितली आहे.

# स्फूर्तिगाथा विकलांग व्यक्तिरेखांची!

**चित्रपटसमाजाचा आरसा असतो. जे समाजात असतं ते चित्रपटात दिसतं. लोकांना पण ते बघायला आवडतं. मात्र, समाजातल्या गोष्टी चित्रपटात जरा अतिशयोक्तीपूर्ण असतात. कारण चित्रपटाचा उद्देश मनोरंजन असतो. गुप्तहेर, त्यांनी केलेल्या कारवाया, त्यांच्याजवळ असणारी शस्त्रास्त्रे, त्यांची वाहने याबद्दल सामान्य जनतेला थोडीशीच आणि तीही ऐकीव माहिती असते. साहजिकच या विषयावर बनलेले हमखास यशस्वी ठरतात. मात्र म्हणतात ना, 'अति सर्वत्र वर्जते!' या प्रकाराचा अतिरेक झाला की तोही नकोसा होतो.**




### धाकड (२०२२)

कंगना राणावतची प्रमुख भूमिका असलेला 'धाकड' हा चित्रपट अतिरेकाचे उत्तम उदाहरण आहे. अग्नी ही एक एजंट आहे. जराही दयामाया न बाळगता ती गुन्हेगार, आतंकवादी यांचा सफाया करीत असते. कथेच्या सुरुवातीला ती बुडापेस्टमध्ये असते. तेथे केलेल्या कारवाईतून तिला शोध लागतो की, शस्त्रे आणि मानव तस्करीच्या मागे भारतात कोणी रुद्रवीर (अर्जुन राम पाल) आणि रोहिणी (दिव्या दत्त) आहेत. त्यांचा शोध घेण्याच्या कामगिरीवर तिला भारतात पाठविण्यात येते. तिला येथे यायचे नसते. कारण बालवयात येथेच तिच्या आईवडिलांचा वध झालेला असतो. पण कर्तव्याखातर तिला यावेच लागते. तिच्या आईवडिलांचा वधकर्ता रुद्रवीरच आहे, हे तर लहान पोरसुद्धा ओळखू शकेल! मग ती या खल-जोडीचा नायनाट करते. असं सांगतात की, चित्रपटातील मारधाडयुक्त भूमिकेसाठी कंगनाने तीन महिने प्रशिक्षण घेतले होते. चित्रपटातील सगळीच साहस दृश्ये उत्तम वठली आहेत. मात्र, चित्रपट सपक झालेला आहे. कारण बरीच आहेत. एकतर कथेत कवडीचेही नावीन्य नाही. नृत्यसंगीत आघाडीवरही निराशाच आहे. नायक-नायिकेचे प्रेमप्रसंग नाहीतच. (कोणी नायकच नाही!) अगदी सुरुवातीला कंगना बिकिनीसदृश कपड्यात दर्शन देते. कशाला? अकारण! खलजोडीतील दोघांची निवड बहुदा स्वस्तात उपलब्ध झालेत म्हणून केलेली वाटते. कुठल्याही चित्रपटगृहात हा चित्रपट सलग सात दिवस टिकला नाही.

### विक्रम (२०२२)



१९८६ साली याच नावाचा चित्रपट आला होता; ज्यात विक्रमची भूमिका कमल हसनने केली होती. २०२२ चा विक्रम त्याच चित्रपटाचा पुढचा भाग म्हणता येईल. चित्रपटाच्या सुरुवातीला काही बुरखेधारी लोक कमन (कमल हसन) या साठीच्या माणसाचा वध करताना दिसतात. पोलिसांजवळ अजून दोन व्हिडीओ असतात; ज्यात एक पोलिस अधिकारी स्टीफन राज (हरीश पेरादी) आणि एसीपी प्रभंजन (कालिदास जयराम) यांचा बुरखेधाऱ्यांनी केलेला खात्मा दिसत असतो. या खूनसत्राच्या अगोदर या पोलिस अधिकाऱ्यांनी ड्रग्जचा मोठा साठा पकडलेला असतो. तिसरा बळी कमन, प्रभंजनचा दत्तक पिता असतो. या म्हाताऱ्याला का ठार केले, हे समजून येत नाही. म्हणून पोलिस चीफ (चेम्बन विनोद जोश) एजंट अमर (फाहाद फासिल) आणि त्याच्या चमूला या बुरखेधाऱ्यांचा शोध काढायला नियुक्त करतो. कमनचा मृत्यू का झाला असावा? याचा अमर माग काढू लागतो. असे समजून येते की, कमन एक दारूडा, गांजेकस, वेश्यागमन करणारा इसम होता. मात्र, त्याचे प्रभंजनच्या मुलावर/नातवावर निरातिशय प्रेम होते. अमरला शोध लागतो की, ड्रग्जचे दोन कंटेनर बेपत्ता आहेत आणि ड्रॅग व्यवसायी संधनम (विजय सेतुपती) त्याचा शोध घेऊन रोलेक्स नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका वरिष्ठ ड्रग डिलरला देऊ इच्छितो. जर त्याने हे साधले तर त्याला या भागाचा अनभिषिक्त राजा बनता येणार असते. वेगवेगळ्या बारीकसारीक सुगाव्यांचा पाठपुरावा करताना अमरला जाणवते की, कमनचा मृत्यू झालेलाच नाही. कमनने एका विवक्षित जागी बसवलेल्या चिपच्या मदतीने अमरला ड्रग संबंधित लोकांची मिटिंग होणार असल्याचे समजते. तो त्यास्थळी पोहोचतो, पण बुरखेधारी अगोदर पोहोचून आपला बळी घेतातच; मात्र नंतरच्या पाठलागात एक बुरखाधारी त्याच्या हाती लागतो. हा बुरखाधारी बिजॉय (नारायण) एक पोलिस अधिकारीच असतो. असो. सगळी पटकथा इथे सांगत बसणे एकतर शक्य नाही आणि ज्यांना हा चित्रपट बघायचा आहे त्यांचाही रसभंग करायला नको. तर, कमन नावाने वावरणारा म्हातारा हा पूर्वाश्रमीचा एजंट विक्रम आहे. त्याला ड्रग्मुक्त समाज निर्माण करायचा आहे आणि त्यासाठीच त्याने हे युद्ध पुकारले आहे. मात्र, त्याच्या मुलाचा बळी गेल्यावर तो स्वतःच्या मृत्यूचे ढोंग करून ड्रग माफिया नष्ट करायला सिद्ध होतो. त्याच्या आसपास वावरणारी साधारण आणि अहानिकारक माणसे धडाकेबाज एजंट्स आहेत. ती वेळप्रसंगी गुन्हेगाराचे कर्दनकाळ ठरतात. चित्रपटात दर दहापाच मिनिटांनी एखादा पाठलाग, अमानुषपणे केलेले खून, बॉम्बस्फोट, रक्तलांछित मारामाऱ्या अशी दृश्ये येत असतात. शेवटच्या लढाईत तर कमल हसन लहानशा पिस्तुलापासून तोफेपर्यंत शेकडो प्रकारची हत्यारे वापरतो. इतका भयानक हिंसाचार पडद्यावर (सुद्धा) बघणे असह्य आहे. चित्रपटात अमरची एक प्रेयसी आहे; त्यांचा विवाहही होतो. मात्र, ती संधनमच्या हस्ते ठार होते. त्यामुळे अमर स्वतःही बुरखेधारी टोळीला सामील होतो. चित्रपटातील सारीच साहसदृश्ये आकर्षक आहेत. पटकथेतील वळणे, धक्के मनोवेधक आहेत. २ तास ५५ मिनिटे चालणारा चित्रपट कुठेही कंटाळवाणा होत नाही, हे पटकथा आणि दिग्दर्शनाचे मोठे यश आहे. चित्रपटात कुठेही प्रेमप्रकरण वगैरे नाही. कारण त्यासाठी वेळच नाही. कमल हसनच्या अभिनयाबद्दल शंकाच घ्यायला नको. तो या चित्रपटाचा निर्माताही आहे. साठी उलटली तरीही माझा जोश अजून कायम आहे, हे दाखवण्यासाठी त्याने हा चित्रपट केला असावा, अशी शंका येते. त्याने तो जोश सिद्ध केला आहे.

फाहाद फासीलने उभा केलेला एजंट अमर असाच प्रभावी आहे.




विजय सेतुपतीने साकारलेला उलट्या काळजाचा क्रूरकर्मा संधनम एकदम झकास! हा चित्रपट सर्वत्र अतिशय यशस्वी ठरला आहे. चित्रपटाअखेर रोलेक्सच्या भूमिकेत सूर्या काही मिनिटांसाठी दर्शन देऊन जातो. बहुदा ही पुढील भागाची नांदी असावी! या चित्रपटात काही चुका आहेत. कमन आपल्या वधाचे जे नाटक करतो ते अगदी थोड्याशा फरकाने अन्य दोन वधांसारखे आहेत. आता पोलिसांना प्राप्त झालेले ते व्हिडीओ बाहेर कुणालाही उपलब्ध नाहीत, मग कमन त्यांची नक्कल कशी काय करतो? प्रभंजनचा वध पोलिस चीफनेच केलेला असतो. अशा स्थितीत तो एजंट अमरला का बोलावतो? कारण अमर त्याचे हे बिंग उघडकीस आणण्याची क्षमता ठेवतो. असं बघा. मुळात कमनने स्वतःच्या वधाचे नाटक केलेच कशाला? तो एक साधारण म्हातारा म्हणून जगत होता. त्याच्याकडे कुणाचेही लक्ष जाणे शक्यच नाही. तो आपल्या कारवाया सहजी करू शकत होता. एजंट अमरमुळे त्याला त्याच्या कारवाया करताना अडचणी येतात, हे टाळले जाऊ शकले असते ना? चित्रपट चांगले मनोरंजन देतो हे खरे, पण मला जाणवलेल्या या चुकांमुळे माझ्या मनातून तो जरा उतरलाच!

आनंद सहस्त्रबुद्धे

# फिल्म इंडस्ट्री हि अतिशय असुरक्षित



अभिनेता विवेक ओबेरॉयचा चित्रपट प्रवास चढ-उतारांनी भरलेला आहे. अनेक उत्तमोत्तम चित्रपटांमध्ये दिसल्यानंतर तो अचानक इंडस्ट्रीतून गायब झाला. चित्रपटसृष्टीतून आलेले असूनही त्यांनी एक काळ पाहिला जेव्हा त्यांच्याकडे चित्रपट नव्हते. अलीकडेच अभिनेता त्याच्या कारकिर्दीतील संघर्ष आणि फिल्म इंडस्ट्रीच्या मूडबद्दल बोलताना दिसला. त्यांनी या उद्योगाचे वर्णन अतिशय असुरक्षित ठिकाण म्हणून केले आहे. विवेक ओबेरॉयने त्याच्या कारकिर्दीच्या आव्हानात्मक टप्प्याबद्दल सांगितले, जेव्हा तो सुमारे दीड वर्षे बेरोजगार होता. 'शूटआउट ट लोखंडवाला' हा हिट चित्रपट देऊनही त्याने आपल्या करिअरमध्ये हा टप्पा पाहिला. सततचा ताण आणि दडपण याचा त्याच्यावर खूप वाईट परिणाम होत असल्याचंही तो म्हणाला.

या मुलाखतीत विवेकने फिल्म इंडस्ट्रीला असुरक्षित स्थान असल्याचे सांगितले, 'मी २२ वर्षांत जवळपास ६७ प्रोजेक्ट केले आहेत, पण इंडस्ट्री ही खूप असुरक्षित जागा आहे. तुम्ही उत्तम काम करू शकता, पुरस्कार जिंकू शकता आणि एक अभिनेता म्हणून जगू शकता, परंतु त्याच वेळी येथे राहून तुम्हाला इतर कारणांमुळे बेरोजगारीचा सामना करावा लागू शकतो. तो म्हणाला, '२००७ नंतर जेव्हा मी शूटआउट लोखंडवाला केले आणि 'गणपत' गाणे व्हायरल झाले, तेव्हा मला पुरस्कार मिळाले, मला आशा होती की आता मला अनेक ऑफर्स मिळतील. परंतु, तसे झाले नाही, उलट दीड वर्ष ते घरीच बसून राहिले. विवेक ओबेरॉय म्हणाला की, २००९ मध्ये त्याने एक महत्वाचा निर्णय घेतला. उद्योगावर अवलंबून न राहता त्यांनी आर्थिक स्वातंत्र्यावर भर दिला. त्यांनी ठरवले की तो बाहेरील शक्तींना त्याच्या भविष्याशी खेळू देणार नाहीत. विवेकच्या म्हणण्यानुसार, 'सिनेमा ही त्याची नेहमीच आवड असेल, पण त्याने व्यवसायाला उपजीविकेसाठी प्लॅन बी म्हणून पाहिले. विवेक ओबेरॉयच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचे तर, त्याने 'मस्ती ४' सह चार चित्रपट साइन केले आहेत.

# मी प्रियंकाची भूमिका जास्त चांगली केली असती

अभिनेत्री ईशा कोप्पिकर बऱ्याच काळापासून सिनेसृष्टीपासून दूर आहे. २००० सालानंतर तिने काही काळ अनेक हिट सिनेमे दिले. नुकताच तिचा 'अयलान' सिनेमा आला. ईशाला म्हणावं तसं यश टिकवता आलं नाही. शिवाय गेल्या वर्षीच तिचा घटस्फोटही झाला. आता नुकतंच ईशाने एका मुलाखतीत शाहरुख खानच्या 'डॉन २' मध्ये प्रियंका चोप्राची भूमिका मी जास्त चांगली केली असती असा खुलासा केला. २००६ साली 'डॉन २' सिनेमा रिलीज झाला होता. यामध्ये शाहरुख खानच्या चार्मने लक्ष वेधलं. तसंच प्रियंका चोप्रानेही दमदार ॲक्शन सीन्स देत आपली भूमिका उत्तम पार पाडली. सिनेमात ईशा कोप्पिकरही छोट्या भूमिकेत होती. नुकतंच तिने प्रियंकाची भूमिका आपण जास्त चांगली केली असती असा खुलासा केला. मुलाखतीत ईशा म्हणाली, मला वाटतं प्रियंकाची भूमिका माझ्या भूमिकेच्या तुलनेत जास्त शक्तिशाली होती. मी ती भूमिका करण्यासाठी सगळं पणाला लावलं असतं. मी प्रामाणिकपणे सांगते मी तायक्वांदोमध्ये ब्लॅक बेल्ट आहे. २५ वर्ष मी तायक्वांदो शिकले आहे. मी अतिशय उत्तम ॲक्शन करु शकते. कोणाही हिरोईनला मी टक्कर देऊ शकते.

अगदी आताच्या माझ्या वयापेक्षा अर्ध्या वयाच्या मुलींनाही मी टक्कर देऊ शकते. मला माहितीये मी चांगलं करेन. पण ठिके, जे झालं ते झालं. यासोबतच ईशा असंही म्हणाली की, २०११ साली डॉनचा सीक्वेल आला. त्यासाठी मी स्वतः फरहान अख्तरला संपर्क केला होता. मात्र त्याने कलाकार आधीच निवडले गेले आहेत असं सांगितलं.

ठिके काही हरकत नाही कधी तुम्ही जिंकता तर कधी हरता. ईशा कोप्पिकरने 'कृष्णा कॉटेज', 'एक विवाह ऐसा भी', 'क्या कूल है हम' सारख्या काही सिनेमांमध्ये काम केलं आहे. दरम्यान काही महिन्यांपूर्वीच ईशाचा पती टिम्मी नारंगसोबत घटस्फोट झाला. आता ती एकटी सात वर्षीय लेकीचा सांभाळ करत आहे.



# गोविंदाने ३ चित्रपटांची केली घोषणा



अभिनय, नृत्य आणि विनोदाचा उत्तम टायमिंग यामुळे एकेकाळी बॉलिवूडमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण करणारा अभिनेता म्हणजे गोविंदा. ८० - ९० च्या दशकात गोविंदाचे अनेक चित्रपट हिट ठरले होते. आजही जगभरात गोविंदाचा मोठा चाहतावर्ग आहे. आता गोविंदाने चाहत्यांना एक खास सरप्राईज दिलं आहे. अलीकडेच 'द ग्रेट इंडियन कपिल शो सीझन २' मध्ये शक्ती कपूर, चंकी पांडे आणि गोविंदा हे सहभागी झाले होते. यावेळी गोविंदाने ३ चित्रपटांची घोषणा केली आहे. प्रदीर्घ काळानंतर गोविंदा पुन्हा एकदा बॉलिवूडमध्ये पुनरागमन करण्यास सज्ज झाला आहे. 'बाएं हाथ का खेल' हा त्याचा पहिला चित्रपट आहे. दुसरा चित्रपट 'पिंकी डार्लिंग' असेल आणि तिसरा चित्रपट 'लेन देन इट्स ऑल अबाउट बिझनेस' हा असेल. मजेशीर गोष्ट म्हणजे या तीन चित्रपटांमध्ये गोविंदा व्यतिरिक्त शक्ती कपूर आणि चंकी पांडे देखील दिसणार आहेत. गोविंदा हा बॉलिवूडचा एकमेव अभिनेता आहे, ज्याला प्रतिभेचा खजिना म्हणणं चुकीचं ठरणार नाही. गोविंदाने 'किल दिल', 'हीरो आ गया', 'फ्रायडे' आणि 'रंगीला राजा' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये कमबॅक केले होते. पण त्याला पूर्वीसारखी लोकप्रियता मिळाली नाही. लॉकडाऊननंतर गोविंदाने चित्रपटांपासून पूर्णपणे दुर राहिला. आता पुन्हा एकदा आपल्या अभिनयाने गोविंदा चाहत्यांची मने जिंकू शकेल का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# सोनू सूद दिग्दर्शनासाठी सज्ज

अभिनयानंतर आता सोनू सुदने दिग्दर्शन क्षेत्रातही एन्ट्री घेतली आहे. त्याचा 'फतेह' हा पहिला दिग्दर्शित चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे. त्यापूर्वी त्याने उज्जैनच्या महाकाळेश्वर मंदिराचे दर्शन घेतले. याचे फोटो त्याने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. मंदिरात पूजा करतानाचे फोटो शेअर करत त्याने लिहिले की, फतेहचा प्रवास महाकालपासून सुरू झाला आणि १० जानेवारी २०२५ रोजी प्रदर्शित होणाऱ्या 'फतेह' चित्रपटाचे प्रमोशन सुरू करताना त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी मी पुन्हा येथे उभा आहे. जय महाकाल. या फोटोंसह त्याने एक व्हिडिओही शेअर केला आहे. या चित्रपटाविषयी बोलताना तो म्हणाल की, 'फतेह' हा केवळ एक ॲक्शन चित्रपट नाही. ही एक कथा आहे जी सायबर गुन्ह्याच्या वेगाने वाढणाऱ्या मुद्द्यांवर प्रकाश टाकते. ज्यात एक थरारक कथा सांगितली जात आहे. हा चित्रपट माझ्या हृदयाच्या खूप जवळ आहे. एक चित्रपट निर्माता म्हणून मी अशी कथा सादर करू इच्छितो जी जगाची कथा सांगते. सोनू सूद दिग्दर्शित हा चित्रपट सायबर गुन्ह्याच्या महत्त्वाच्या मुद्द्यावर लक्ष केंद्रित करणारी कथा सांगणार आहे. यात जॅकलीन फर्नांडिस, विजय राज आणि नसीरुद्दीन शाह यांसारख्या अनेक स्टार्सचा समावेश आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर रिलीज केला आहे. झी स्टुडिओ आणि शक्ती सागर प्रॉडक्शन प्रस्तुत 'फतेह' १० जानेवारी २०२५ रोजी थिएटरमध्ये रिलीज होणार आहे.

